महाराष्ट्र शासन

# अधिदान व लेखा कार्यालय

☎ ०२२-२६५६६३००/३३२
E-mail : pao_mumbai@yahoo.co.in
Fax No. ०२२-२६५९१५८८

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/आस्था/अ/मार्च अल्पोपहार/ १०१५

दि. 20 JAN 2023

प्रति,
मा. सहसंचालक (संगणक),
संचालनालय, लेखा व कोषागारे,
संगणक कक्ष, ५ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत,मंत्रालयासमोर,
मुंबई – ४०००२१

**विषय :-** मार्च २०२३ अखेर अल्पोपहार व जेवण याबाबत दरपत्रकाचे सूचनापत्रक शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दि. ३०/०३/२०२३ व दि. ३१/०३/२०२३ रोजी अल्पोपहार व जेवण पुरविण्याबाबतचे सोबत जोडलेले नवीन दरपत्रकाचे सूचनापत्र कृपया **www.mahakosh.maharashtra.gov.in** या संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

आपली,

रश्मी नांदिवडेकर

**( रश्मी नांदिवडेकर )**
**अधिदान व लेखा अधिकारी**

**सहपत्र :- वरीलप्रमाणे.**

# अधिदान व लेखा कार्यालय

महाराष्ट्र शासन

☎ ०२२-२६५६६३००/३३२
E-mail : pao@mahakosh.in
Fax No. ०२२ - २६५९१५८८

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/आस्था/अ/ 1015

दि. 20 JAN 2023

**-: दरपत्रक सूचना :-**

अधिदान व लेखा कार्यालयातील वांद्रे (पु) व चर्चगेट येथील अधिकारी / कर्मचारी वर्गाला दि. ३०.०३.२०२३ व दि. ३१.०३.२०२३ रोजी खालीलप्रमाणे अल्पोपहार (नाश्ता, चहा/कॉफी) व रात्रीचे जेवण पुरविणेबाबत दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| दिनांक | खाद्यपदार्थाचे प्रकार | पुरवठा करण्याची वेळ | पुरवठा करावयाचे नग |
|---|---|---|---|
| ३०.०३.२०२३ | बटाटा वडा / कटलेट / अननस शिरा **(यापैकी एक पदार्थ)**<br>चहा = १ वेळा<br>कॉफी =१ वेळा | सायंकाळी ४.०० वाजता | ५०० प्लेट<br>२५० कप चहा<br>२५० कप कॉफी |
| ३१.०३.२०२३ | बटाटा भजी/ मिक्स भजी व जिलेबी<br>चहा = १ वेळा<br>कॉफी =१ वेळा | सायंकाळी ४.०० वाजता | ५०० प्लेट<br>२५० कप चहा<br>२५० कप कॉफी |
| ३१.०३.२०२३ (रात्रौ) | **जेवण (शाकाहारी जेवण)** : जिरा राईस, डाळ तडका, पुरी / चपाती, काजू मसाला, पनीर मटर, तवा फ्राय व्हेजिटेबल, कटलेट, पुरी, भजी, कोशिंबीर, लोणचे, पापड, चटणी, गोड पदार्थ (रबडी / सिताफळ बांसुदी) | रात्रौ ८.०० वाजता | ५०० थाळी |

**दरपत्रकासंबंधी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-**

1. पुरवठाधारकांनी अन्न, औषध प्रशासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
2. पुरवठाधारकांनी वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
3. पुरवठाधारकांनी त्यांच्या/संस्थेच्या PAN card ची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
4. उपरोक्त नमूद खाद्यपदार्थ सुस्थितीत, ताजे तसेच कर्मचाऱ्यांना नाश्ता, चहा/कॉफी त्यांच्या बैठकीच्या जागेवरच पुरविण्याची जबाबदारी पुरवठा धारकांची राहील.

5. वरील नमुद संख्येत कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच उपरोक्त दिनांका व्यतिरिक्त इतर दिवशी कार्यालय चालु राहण्याची शक्यता गृहित धरून नाश्ता, चहा/कॉफी पुरविण्याबाबत कळविण्यात आल्यास दरपत्रकातील नमुद दरानेच पुरवठा करावा लागेल.
6. उपरोक्त दिनांकामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
7. उपरोक्त दरपत्रके स्विकारण्याचे व नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे कडे राहतील.

तरी आपली दरपत्रके अधिदान व लेखा कार्यालय (आस्थापना शाखा), दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ येथे दिनांक १९.०१.२०२३ ते दिनांक ३०.०१.२०२३ या कालावधीत संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात सादर करावीत. तसेच दरपत्रके दिनांक ३१.०१.२०२३ रोजी संध्या. ४.०० वाजता उपरोक्त नमूद ठिकाणी उपस्थित असलेल्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

**अधिदान व लेखा अधिकारी**

प्रति,